# प्रेस नोट दि.१५/०४/२०१७

## गुन्हे शाखेकडील दरोडा प्रतिबंधक पथकाने खडकी पोलीस स्टेशनकडील खूनाचे गुन्ह्यातील पळुन गेलेल्या आरोपीस मालेगाव, नाशिक येथुन अटक

खडकी पोलीस स्टेशन गुन्हा रजिस्टर नं ८०/२०१७ भादंवि कलम ३०२, १४३, १४४, १४७, १४८, १४९ मधील आरोपी नामे सिराज आमिर कुरेशी, वय ४५ वर्षे, रा. सुरती मोहल्ला, खडकी बाजार, पुणे याने व त्याचे ८ ते ९ साथिदारांने पुर्वीच्या भांडण्याचे कारणावरुन मृतक इसम योगिराज शिवराज खंडाळे, वय २१ वर्षे, रा. जुना बाजार, खडकी, पुणे यास तलवार, चॉपर अशा धारदार हत्याराने मानेवर, कानावर, पाठीत वार करुन त्याची निघृणपणे दि. ३१/०३/२०१७ रोजी रात्री. ११.०० वा. चे सुमारास एलफिस्टन रोड, खडकी, पुणे येथे हत्या केली आहे. सदर गुन्ह्यात आरोपी सिराज कुरेशी व त्याचे इतर साथिदारांना खडकी पोलीसांनी अटक केली होती. दि. ०९/०४/२०१६ रोजी खडकी पोलीस ठाणेतील संडासचे शेजारी असलेल्या पॅसेजचे लोखंडी ग्रीलचा गज कशाने तरी कापुन गुन्ह्यातील मुख्य आरोपी सिराज कुरेशी व चौकशी करीता आणलेला इसम नामे सनी विजय ॲन्डी रा. आनंदपार्क धानोरी रोड, पुणे हे दोघेजण कायदेशीर रखवालीतून पळून गेले होते. त्यांचेविरुध्द खडकी पोलीस ठाणे गुरनं ८८/२०१७ भादंवि क २२४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पळून गेलेला आरोपी सनी ॲन्डी यास दि. १२/०४/२०१६ रोजी गुन्हे शाखा, युनिट -१, पोलीसांनी अटक केली आहे.

आरोपी सिराज कुरेशी हा गुन्ह्यातील मुख्य आरोपी पोलीस रखवालीतून पळून गेले नंतर त्याचा शोध घेणेकामी गुन्हे शाखेकडील पोलीस अधिकारी कर्मचारी यांची पथके तयार करण्यात आली होती. दि. १४/०४/२०१७ रोजी दरोडा प्रतिबंधक पथकाचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम यांना बातमी मिळाली की, आरोपी सिराज कुरेशी हा मालेगाव जिल्हा नाशिक येथे त्याचे नातेवाईकांकडे गेलेला आहे. त्यानुसार दरोडा प्रतिबंधक पथकातील सहाय्यक पोलीस निरीक्षक लक्ष्मण ढेंगळे व पोलीस कर्मचारी यांचे पथक तातडीने मालेगाव येथे रवाना केले. मालेगाव येथे जाऊन आरोपी सिराज कुरेशी याचा शोध घेतला असता तो तुळशी वृंदावन चौक, मालेगाव, नाशिक येथे दि. १५/०४/२०१७ रोजी मिळुन आला आहे. त्यास खडकी पोलीस ठाणेकडील वरील गुन्ह्यात अटक करण्यात आली आहे. त्याचे विरुध्द विविध पोलीस ठाण्यात एकुण १८ गुन्हे दाखल आहेत.

सदरची कामगिरी मा. अपर पोलीस आयुक्त, सो. गुन्हे श्री. दिपक साकोरे, पोलीस उप आयुक्त सो. श्री पी. आर. पाटील, सपोआ. गुन्हे-१ श्री सुरेश भोसले, यांचे मार्गदर्शनाखाली दरोडा प्रतिबंधक विभागाचे पोलीस निरीक्षक राजेंद्र कदम, सपोनि लक्ष्मण ढेंगळे, कर्मचारी सपोफौ यशवंत आंब्रे, संजय दळवी, निलेश पाटील, संतोष पागार यांनी केली आहे.

